International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Vol.2 No.1 Sept - Oct 2014

# ‘वैष्णव’ कादंबरी - एक विश्लेषण
# वि.वा. शिरवाडकर

**डॉ. बाळासाहेब खोमणे**
मराठी विभाग
एल्फिन्स्टन महाविद्यालय, मुंबई-३२

वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज हे मराठी माणसाच्या हृदयसिंहासनावर विराजमान झालेले अद्वितीय व्यक्तिमत्व आहे. मराठी साहित्यात आपल्या लेखणीने समस्त मराठी माणसावर गारुड केलेले हे लेखक आहेत. मराठी साहित्यातील प्रत्येक साहित्यप्रकारचे लेखन करून त्यांनी मराठी मनाला भुरळ घातली आहे. असे असले तरी त्यांचा लौकिक आहे तो कवी आणि नाटककार म्हणूनच. त्यांनी कादंबऱ्या ,ललितनिबंध आणि कथाही लिहिल्या आहेत. त्यांच्या नटसम्राट, कौंतेय, दूरचे दिवे, दुसरा पेशवा, आमच नाव बाबूराव, वैजयंती, राजमुकुट यासारख्या नाटकांनी नाट्यरसिकांना वेड लावले. जीवनलहरी, विशाखा, हिमरेषा, वादळवेल, स्वगत, किनारा, समिधा या त्यांच्या कवितासंग्रहांनी मराठी साहित्यात आपले आढळ स्थान निर्माण केले आहे. बारा कथा, फुलवाली आणि सतारीचे बोल हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. आहे आणि नाही हा ललितलेख संग्रह आणि वाटेवरच्या सावल्या ( आठवणी ) या पुस्तकांनी मराठी माणसाचे मन जिंकले आहे. कादंबरीच्या क्षेत्रात्तही त्यांचे योगदान आहे. जान्हवी, वैष्णव आणि कल्पनेच्या तीरावर या त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.

लोकमान्य टिळक यांच्या निधनानंतर राष्ट्रीय सभेची सूत्रे महात्मा गांधी यांच्या हातात आली. त्यांनी सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह या मूल्यांचा उद्‌घोष करून सर्वसामान्य माणसामध्ये आत्मभानाची ज्योत पेटविली. त्यातूनच पुढे सर्वस्वाचा त्याग करणारी एक पिढीच निर्माण झाली. महात्मा गांधी यांनी इंग्रजांना चले जाव हा इशारा दिला. या चले जाव चळवळीचे प्रभावक्षेत्र शहराच्या मर्यादा ओलांडून ग्रामीण भागात पोहचले. या चळवळीच्या प्रभावामुळे मुरारवाडी या छोट्या खेड्यात जे नाट्य उभे राहिले त्याचे चित्रण ‘वैष्णव’ या कादंबरीत वि. वा. शिरवाडकर यांनी केले आहे.

‘वैष्णव’ कादंबरीचा नायक विनायक मास्तर हे आहेत. ते सात्विक वृत्तीचे, सज्जन. रस्त्याने जातांना त्यांची नजर जमिनीवर स्थिर झालेली असे. कोणाशीही बोलण्याऐवजी नदीकाठी किंवा माळरानावर ते एकटेच जाऊन बसत असत. त्यांनी आयुष्यात कोणालाही दुखावले नाही. त्यांच्या डोळ्यात नेहमी सौजन्य ओथंबून वाहत असे. समाजात वावरतांना सौजन्य आणि नम्रता यांचा सुरेख संगम त्यांच्या व्यक्तीमत्वात झालेला होता. विनायकरावांचे घर अतिशय साधे होते. साध्या पद्धतीची बैठकीची खोली, मध्ये माजघर आणि आतली खोली स्वयपाकाची होती. बैठकीच्या खोलीत एक फाटकी आणि रंग गेलेली सतरंजी असायची. सतरंजीवर भिंतीला खेटून एका मलीन गादीची वळकटी ठेवलेली होती. तिच्या उसवलेल्या शिवणीतून कापसाचे लहान पुंजके गादीबाहेरच्या जगात कुतूहलाने पाहत होते. त्याच्या बाजूला एक आरामखुर्ची, काळाच्या ओघात काळे पडलेले एक टाइमपीस, जुन्या पुस्तकांचा गठ्ठा, भिंतीवर दोन फोटो एक दत्ताचा आणि दूसरा महात्मा गांधी यांचा.

विनायकराव लोकल बोर्डाच्या शाळेमध्ये नोकरी करीत होते. त्यांना महिनाकाठी बावीस रुपये पगार मिळत होता. त्या पगारावर त्याचा कसा- बसा त्यांचा उदरनिर्वाह होत असे. त्यांची पत्नी उमा अतिशय सोज्वळ होती. पतीच्या फाटक्या संसारात ती आनंद मानणारी आहे. परिस्थितीशी संघर्ष करतांना विनायकराव यांना तिचाच आधार आहे. एक नऊवारी साडी आवडली असतांनाही ती लटकेच म्हणते, मला ती साडी आवडली नाही. उलट आपल्या नवऱ्याचा कोट जुना झाला आहे म्हणून नवा कोट घेण्याचा ती आग्रह करते. विनायकराव आणि उमा यांना एक आरु नावाचे अपत्य आहे. मुरारवाडीच्या ज्या शाळेवर विनायक मास्तर काम करतात, तेथे त्यांचे हेडमास्तर होते आबा गुरुजी. आबा गुरुजींचे शाळेकडे लक्ष्य कमी आणि राजकारणात जास्त असे. असे असले तरी विनायक मास्तरांवर हुकुमत गाजविणे यात त्यांना धन्यता वाटत होती. एकदा शाळा तपासणीसाठी लोकल बोर्डाचे साहेब येणार असतात. विनायकराव गुरुजी नेहमीप्रमाणे शाळेत गेले. " विनायकराव शाळेची नोकरी म्हणजे सरकारने नजर केलेली जहागिरी समजता वाटत तुम्ही" असे आबा मास्तरांचे शब्द त्यांच्या कानी पडले. आबांनी आपल्या हुकुमतीत विनायकरावांना शाळा स्वच्छ करण्यास फर्मावले. विनायकरावांनी स्वतः शाळा सारवून घेतली. दुसऱ्या दिवशी शाळा तपासणी झाली. विनायकरावांची आबांच्या सांगण्यावरून साहेबांनी चागली खरडपट्टी काढली. विनायक मास्तरांना नोकरी जाण्याचे भय वाटू लागले. विनायक मास्तर निराश झाले.

मुरारवाडीपासून दीड मैलावर एक दगडी चौथरा होता. या चौथार्याविषयी लोकांच्या मनात अनेक समज – गैरसमज होते. ( सगळे समज – भूत हडळ, खैस वगैरे ) त्या चौथऱ्याकडे जाण्यास सहसा कोणी धजत नसे. मात्र रंभाजी तासनतास त्या चौथऱ्यावर बसलेला असायचा. रंभाजी हा सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्ता होता. त्याचा शहरांशी परिचय झालेला होता. तो अत्यंत धाडशी होता. त्याच्या नादी इंदोरी किंवा मुरारवाडीतील कोणीही व्यक्ती लागत नसे. असाच एकदा तो त्या चौथऱ्यावर बसलेला असतांना एक भिरकं ( टांगा ) चौथऱ्याच्या दिशेने येत होते. त्यामधील एक बाई आपली सुटका करून घेण्यासाठी धडपडत होती. रंभाजीने भिरके आडविले. भिरक्यामध्ये दलपतराव आणि रतनशेठ बसलेले होते. दलपतराव आणि रतनशेठ गावातील प्रतिष्ठीत आसाम्या (श्रीमंत व्यक्ती) होत्या. दोघेही रगेल आणि रंगेल होते. बिंदूरावची विधवा सून पद्मावती हिला कर्वेकडे पोहोचविण्याच्या बहाण्याने फसवून घेऊन चाललेले होते. रंभाजीने पद्मावतीची दलपतराव आणि रतनशेठ यांच्या तावडीतून सुटका केली. तिला घेऊन रंभाजी विनायक मास्तरांच्या घरी आला. पद्मावती जेमतेम शिकलेली असली तरी वाचनाने तिचे मन सुधारकी विचारांचे झाले होते. रंभाजीने पद्मावतीस विनायकराव गुरुजी यांच्याकडे रहावयास सांगितले.

मुरारवाडीचे आराध्यदैवत भैरवनाथाची यात्रा होती. ही यात्रा करून पद्मावती पुण्याला जाणार होती; पण उमा आणि विनायकराव यांच्या आग्रहामुळे पद्मावती पुण्याला जाऊ शकली नाही. या यात्रेमध्ये मालोजीराव महाराज यांचे कीर्तन झाले. मालोजीराव महाराज हे महात्मा गांधी यांचे कट्टर अनुयायी होते. त्यांनी प्रवचनाचा प्रारंभ "मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास" या संत तुकाराम महाराज यांच्या अभंगाने करून त्याचा अर्थ उलगडण्यास सुरुवात केली. एखाद्याला मदत करायची असल्यास गाय-वासरू असा स्नेहभाव असावा असे सांगितले. दुर्बलांना सामर्थ्यवान बनवा, दीनांना धारिष्ट्य बनवा, सेवा करा. अन्यायाविरुद्ध पेटून उठा. दुष्टपणावर वज्रप्रहार करा. भीतीचा त्याग करा. हा त्यांच्या प्रवचनाचा सार होता. या गोष्टीचा परिणाम विनायकराव मास्तर यांच्या मनावर झाला. आपण प्रत्येक गोष्टीला घाबरतो असे त्यांना वाटले. त्यांच्या मनातील भीती नाहीशी झाली. नोकरी गेली तरी बेहत्तर पण

आबा मास्तरांचा अन्याय सहन करणार नाही, असे म्हणून त्यांनी एके दिवशी लोकल बोर्डाच्या साहेबांसमोर नोकरीला रामराम ठोकला. नोकरी सोडून एखाद्या विजयी वीराप्रमाणे ते घरी आले. घरी उमा आजारी होती. डॉक्टरला आणण्यासाठी ते इंदोरीला गेले. तेथील सरकारी दवाखान्यातील डॉक्टरांनी घरी येऊन उपचार करण्यास नकार दिला. इकडे पद्मावती आणि रंभाजी यांनी खाजगी उपचार सुरु ठेवले होते. मास्तर प्रधान डॉक्टरांना घरी घेऊन आले, तो पर्यंत उमेची प्राणज्योत मालवली होती.
विनायकराव – पद्मावती – आरु एकत्र राहू लागले. नोकरी नसल्याने पैशाची चणचण भासू लागली. विनायकमास्तरांनी हर प्रकारे दुसरी नोकरी मिळविण्याचा प्रयत्न केला. व्यापारी रतनशेठमुळे त्यांना नोकरी देत नव्हते, उलट कावळे वकीलांनी दिलेली नोकरी रतनशेठ मुळे गेली.

उदरनिर्वाहासाठी विनायकरावानी मुंबईला जाण्याचा आणि नोकरी करण्याचा निर्णय घेतला. विश्वनाथ शिर्के या तरुणाबरोबर मास्तर मुंबईला गेले. १९४२ चा ऑगस्ट महिना होता. महात्मा गांधी यांनी 'चले जाव' ची घोषणा केली होती. स्वातंत्र्य संग्रामाचे वारे सगळीकडे जोराने वाहत होते. विनायकराव आणि विश्वनाथ मुंबईला पोहचले. मुंबईतील जहांगीर इमारतीत शिर्के, चव्हाण व गडकरी या आपल्या दोन मित्रांसह राहत होता. ८ ऑगस्ट १९४२ची संध्याकाळ होती. गवालिया टँकवर हजारो लोकांची गर्दी जमली होती. तेथे विनायकराव, शिर्के, चव्हाण आणि गडकरी चौघेही पोहचले. तेथे मोठी सभा झाली. गवालिया टँकवरील सभेनंतर सर्व मोठ्या नेत्यांना पकडण्यात आले. त्याचा उद्रेक म्हणून ठिकठिकाणी ब्रिटीश पोलीस आणि भारतीय जनता यांमध्ये चकमकी सुरु झाल्या. सगळीकडे संचारबंदी सुरु झाली. मृत्यू समोर असतांनाही भारतीय जनतेचे धैर्य कमी झाले नव्हते. सुडाच्या, प्रतिकाराच्या आणि देशनिष्ठेच्या आत्यंतिक भावनेने अडाणी, अशिक्षितांची मने उन्मत्त झाली होती. या चकमकीत चव्हाण गोळीबारात ठार झाला. शिर्के पकडला गेला.

आपण बंडाच निशाण उभारणार? मुरारवाडीच्या शाळेतील खाली मान घालणारा आपणासारखा दुबळा शाळा मास्तर. विनायकरावांना आठवलं, "मायबापाहूनी आम्ही मायावंत, करू घातपात शत्रुहुनी" असा मालोजीराव महाराजांनी उपदेश केला आहे. आपण स्वतंत्र आहोत. प्राणाची किंमत देऊन स्वातंत्र्याचे रक्षण केले पाहिजे. चव्हाणाचा तो पराक्रम, त्याची किडकिडीत मग्रूर वृत्ती, संघर्षासाठी आपल्याला खुणावत आहे. रस्त्यात पाहिलेले ते बलिदान, महात्मा गांधींची तसबीर लावणारा कांबळे वकील आणि आपण यात फरक पडतो तो कुठला? आपण चव्हाण, गडकरी, शिर्के चांगले मित्र आहोत. आता वैष्णव होण्याची संधी आपल्यासमोर आली आहे.

वैष्णव होऊन विनायकराव मास्तर मुरारवाडीला आले. त्यांनी रंभाजीच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध सशत्र उठाव केला. इंदोरीवर कब्जा मिळविला. कचेरी ताब्यात घेतली. तिरंगा ध्वज डौलाने फडकू लागला. पोलीस, मामलेदार यांना ताब्यात घेतले. सरकारी खजिना लुटला. गाव आणि तालुका एका शाळा मास्तरने स्वतंत्र केला असला तरी ब्रिटीश पोलिसांपुढे त्यांचा निभाव लागला नाही. रंभाजी चकमकीत ठार झाला. मास्तर पकडले गेले.

वि. वा. शिरवाडकर यांच्या कादंबरीतील पात्रे अतिशय मोजकी परंतु मनाचा ठाव घेणारी आहेत. यातील प्रसंगही आटोपशीर आहेत. घटनांमध्ये नाट्यमयता येते. घटना क्रमवार घडत जातात, त्यातून एक जीवनपट उभा केला जातो.

"शिरवाडकरांवर वि. स. खांडेकर यांचे संस्कार आहेत. त्यातून त्यांनी 'वैष्णव' ही कादंबरी रचली आहे."[१] १९२० नंतर राष्ट्रीय सभेची सूत्रे महात्मा गांधी यांच्या हाती आली. महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा या विचारांचे मराठीत काही कादंबऱ्यात चित्रण येऊ लागले. साने गुरुजी, प्रेमा कंटक, भा. वि.

वरेरकर, वि. स. खांडेकर, वि. वि. बोकील आणि वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्यात काही प्रमाणात गांधीवादाचे चित्रण आले.

हा गांधीवादाचा परिणाम राजकारण आणि समाजकारणावर पडू लागला. सुशिक्षित, अशिक्षित गरीब – श्रीमंत स्त्री- पुरुष इ.अनेक घटक राष्ट्रीय चळवळीत सहभागी होऊ लागले. महात्मा गांधी यांनी ब्रिटीश सत्तेला ‘चले जाव’ चा आदेश दिला. याचे चित्रण वैष्णव कादंबरीत येते. “ फडके, खांडेकर, शं. बा. शास्त्री यांनी या चळवळीचे चित्रण आपल्या कादंबरीत केले आहे. तसे “ वि. वा. शिरवाडकरांची ‘वैष्णव’ या चळवळीचा प्रभाव दर्शवितात.”[२]

१९४२ चा कालखंड हा नव्या युगाचा, नव्या जाणीवा प्रकट करणारा कालखंड आहे. विनायकराव मास्तर अतिशय हळवे, घाबरट अशा स्वभावाचे. सत्शील सत्प्रवृत्त. शाळेसाठी अपार कष्ट करण्याची तयारी असलेले. मालोजीराव महाराज या गांधीवादी विचारवंतांचे प्रवचन ऐकल्यावर त्यांच्यात अमुलाग्र बदल होतो. हेडमास्तर आबासाहेब आणि लोकल बोर्डाचे शाळा तपासणीस यांच्यासमोर झुकायचे नाही. नोकरी गेली तरी बेहत्तर असा आत्मविश्वास त्यांच्या मनात निर्माण होतो आणि ते क्रांतिकारक होतात. “ वैष्णव मध्ये १९४१ च्या लढ्यात निर्माण झालेले संतप्त वातावरण, तरुणांना महात्मा गांधीनी दिलेला संदेश आणि त्यामुळे निर्माण झालेली तरुण क्रांतिकारकांची संघटना या घटना आधाराला घेऊन विनायकरावांच्या व्यक्तिजीवनात घडलेल्या भावनिक, आंतरिक आणि मानसिक परिवर्तनाचा शोध घेण्याचा प्रयत्न झाला आहे.”[३] या संदर्भात शोभा देशमुख लिहितात, “सामान्य माणवाच्या जीवनातील असामान्यत्वाचा शोध घेण्याचे त्यांच्या नाट्यलेखनीला वेड आहे. या कादंबरीतही एक सामान्य शाळामास्तर विशिष्ट परिस्थितीत, विशिष्ट प्रसंगी असामान्यत्वाची किती उंची गाठू शकतो याचे दिग्दर्शन केले आहे.”[४]

वि. वा. शिरवाडकर यांच्या वैष्णव कादंबरीलाही राजकीय घटनांचे प्रेरक अस्तर आहे. एक सामान्य शिक्षक देशभक्तीच्या भावनेचा स्पर्श होताच कसा अंतर्बाह्य बदलून जातो, नेतृत्व करू शकतो याचे प्रत्ययकारी चित्र या कादंबरीत उमटले आहे”[५] असे असले तरी या कादंबरीच्या संदर्भात एक आक्षेप घेण्यात येतो, “पण ही कादंबरी तशी फारच एकेरी स्वरुपाची वाटते”[६] याचे कारण कुसुमाग्रजांचे आवडते क्षेत्र आहे ते कविता आणि नाटक. कविता आणि नाटक यापेक्षा कादंबरीचे क्षेत्र फार वेगळे आहे ‘विस्तृत जीवनदर्शन’ हा कादंबरीचा मूळ गाभा आहे. शिवाय कादंबरीत सलगपणा, एकसंघपणा आणि एकजीव अशी अनुभूती त्यात यावी लागते. कुसुमाग्रज हे मूळ काव्यवृत्तीचे, त्यांना कादंबरीचा आकृत्तीबंध मानवणारा नाही. म्हणूनच वरील आक्षेप साधारण परिस्थितीत लक्षात घ्यावा लागतो. असे असले तरी हा प्रकार हाताळल्यामुळे समकालीन साहित्यिकात त्यांना नाते प्रस्थापित करता आले. ही गोष्ट लक्ष्यात घ्यावी लागते.

संदर्भ :-

१. कुसुमाग्रज साहित्यदर्शन, वैष्णव ते कल्पनेच्या तीरावर, उषा मा. देशमुख, शलाका प्रकाशन, प्रथम आवृत्ती मे १९८९, पृष्ठ क्र. १९९

२. सामाजिक शास्त्रे आणि साहित्य : अंतःसंबंध, प्राचार्य डॉ. ह. श्री. साने, (लेख- स्वातंत्र्यपूर्वकालीत मराठी कादंबरी :राजकारणविषयक संसूचन, डॉ. वसन्त कृ. क्षीरे) - प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती- १९९५, पृष्ठ – १६८

३. कुसुमाग्रज साहित्यदर्शन, वैष्णव ते कल्पनेच्या तीरावर, उषा मा. देशमुख, शलाका प्रकाशन, प्रथम आवृत्ती मे १९८९, पृष्ठ क्र. १९७

४. शिरवाडकरांची नाटके, शोभा देशमुख, कवी कुसुमाग्रज आणि वि. वा. शिरवाडकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,प्रथमावृत्ती १९८४, पृष्ठ क्र. १४

५. मराठी कादंबरीचा इतिहास, डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर, मराठी कादंबरी :स्वरूप आणि प्रवृत्ती, प्रकाशक मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृष्ठ ६८

६. मराठी कादंबरीचा इतिहास, डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर, मराठी कादंबरी :स्वरूप आणि प्रवृत्ती, प्रकाशक मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृष्ठ ६८